नियमीत फौ. ख. क्र. ४६/२०२२
सरकार वि. सुरेश + १
निशाणी– २८.

**<u>सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. ३ ची जबानी.</u>**
**<u>मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,</u>**
**<u>माझे नाव</u>** – मच्छींद्र रामचंद्र कासव,
**<u>वय</u>**– ६३ वर्ष– धंदा– शेती.
**<u>राहणार</u>** – पाटे, ता. चांदवड, जि. नाशिक.

.......................................................................................................

**<u>सरकारपक्षाच्या वतीने साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एन. पी. मोरे यांच्या मार्फत शपथेवर सुरु.</u>**

**०१.** दिनांक ०४/०२/२०२२ रोजी पोलिसांनी मला बोलाविले व सही घेतली होती. पोलिसांनी पंचनामा केला होता व गाडी उभी होती. आता साक्षीदाराला नि. क्रं. २४ वरील घटनास्थळ पंचनामा दाखवला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे.

**सरतपास संपला.**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे श्री. ए. टी. देवरे वकिल यांच्यामार्फत शपथेवर सुरु.</u>**

**०२.** हे म्हणणे खरे आहे की, कोलटेक व पाटे वेगवेगळी गावे आहेत. मी पाटे येथील पोलिस पाटील आहे. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्यातील मजकूर मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी तेथील स्थानीक रहिवासी नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, दुसरा पंचाबाबत मला माहिती नाही. मी रस्त्याने जात असतांना पोलिसांनी मला बोलावून घेतले होते. मी दुसरा पंच अनिकेत निंबाळकर याला ओळखत नाही व त्याला व्यैयक्तीक बघितले नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलिस पाटील असल्याने पोलिसांनी सांगितल्यास पंचनाम्यावर सहया कराव्या लागतात. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा कथन केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**
**फेरतपास काही नाही.**
**वा. दा. कबूल केले.**

Digitally signed by SUMIT SURESHCHANDRA CHHALLANI
Date: 2025.10.09 18:22:58 +0530

**(एस. एस. छल्लाणी)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,**
**चांदवड .**
**दि. ०९/१०/२०२५.**

समक्ष,

Digitally signed by SUMIT SURESHCHANDRA CHHALLANI
Date: 2025.10.09 18:23:03 +0530

**(एस. एस. छल्लाणी)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,**
**चांदवड.**